Vol 3 Issue 3 Sept 2013

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-3 | Sept-2013
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# महात्मा गांधीचे ग्रामस्वराज्य विषयक विचार

**प्रा. आर. बी खरडे**

राजेंद्रसिंह उर्फ बाबा व्यास कला व वाणिज्य महाविद्यालय , कोंढाळी.

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी २० व्या शतकातील अलौकीक व असामान्य व्यक्तीमत्व असून, त्यांनी तत्कालीन भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक विचारसरणीवर खोलवर ठसा उमटविला आहे. तसेच महात्मा गांधी आधुनिक काळातील सत्य, अहिंसा आणि शांतीचे जनक मानले जाते. महात्मा गांधीजींच्या मते खरा भारत शहरात नसून खेडयात आहेम्हणून ग्राम हा प्रशासनाचा मुलभूत घटक असून, ग्राम किंवा खेडयांना स्वयंपूर्ण कराने ही काळाची गरज आहे, असे गांधीजींना वाटत. महात्मा गांधीच्या विचारावर टॉलस्टाय, थोरो, जॉन रस्कीन इ. विचारवंताचा प्रभाव होता. भारत कृषीप्रधान देश असून तो खेडयांचा देश आहे. भारतातील हया खेडयांना स्वयंपुर्ण, स्वावलंबी बनविणे हे गांधीजींच्या आर्थिक विचाराचे मुख्य सुत्र होते. भारताला स्ववलंबी बनविण्यासाठी खेडे हा घटक केंद्रबिंदू माणून ती स्वावलंबी व स्वयंपूर्ण कशी होतील या दिशेने प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे गांधीजींना वाटत होते. खेडी स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गातील एकमेव अडथळा म्हणजे वाढते औद्योगीकरण होय, असे गांधीजींचे मत होते. औद्योगीकरणातून गरीबी वाढते, मजूर बेकार होतात, उत्पादन साधनाचे केंद्रीकरण होते. म्हणून गांधीजींनी विकेंद्रीकरणावर भर दिला आहे. महात्मा गांधी या पुढे जाऊन असे म्हणतात की, शहरे ही खेडयाचे शोषण करतात. तर शहरातील लोकांना असे वाटते की, भारत शहरामध्ये राहतो आणि आमच्या गरजांची पुर्तता करण्याकरीता खेडी आहेत. खरा भारत खेडयात असल्याने खेडयातील लोकांना सुखी जीवन जगण्यासाठी रोजगार मिळावा. त्यांच्या गरजा खेडयात पूर्ण व्हाव्या, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, आर्थीक विषमता नष्ट व्हावी, म्हणून महात्मा गांधीनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली आहे.

भारतातील खेडे भारताइतकीच जुनी आहेत, महात्मा गांधीच्या मते भारत शहरात नसून ७ लाख खेडयात राहतो. मात्र आज शहरांचा बोलबाला असून ती खेडयातील सर्व संपत्ती धुऊन नेत आहे. त्यामुळे खेडयाचा ऱ्हास व नाश होत आहे. खेडयांचे शोषण हाही संघटीत हिंसेचा एक प्रकार आहे. आम्हाला जर अहिंसाधिष्ठीत स्वराज्य स्थापन करावयाचे असेल, तर त्यात खेडयांना त्यांचे योग्य स्थान देणे आवश्यक आहे. खेडयांचा नाश म्हणजे भारताचा नाश असे गांधीजींचे मत होते. त्यामुळे भारताची अस्मिताच नष्ट होईल.[१] शहरातील लोकांना भारत शहरांमध्ये राहतो आणि आमच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी खेडी आहेत. या खेडयातील निर्धन लोकांजवळ खाण्यापिण्याची पुरेशी व्यवस्था आहे किंवा नाही आणि उन-पावसापासून संरक्षण होण्यासाठी काही निवारा त्यांना आहे की नाही हे माहित करून घेण्याचा आपण कधीही प्रयत्न केला नाही. शहरातील लोक जगावे म्हणून आतापर्यंत खेडयातील लोकांनी हजारोंच्या संख्येत बलिदान दिले आहे. आता खेडयातील लोकांनी जगावे म्हणून शहरातील लोकांनी आहुती देण्याची वेळ आली आहे. आपण शहरातील लोकांनी त्यांच्याकरीता बलिदान केले, तर त्यामुळे आमचे आणि आमच्या संपूर्ण राष्ट्राचे उदात्तीकरण होईल. जर आपल्याला एक स्वातंत्र्य आणि स्वाभिमानी राष्ट्र म्हणून जगायचे असेल तर या त्यागापासून आपण माघार घेता कामा नये.[२]

सुराज्याची निर्मीती करण्यासाठी स्वराज्याची आवश्वकता आहे, व स्वराज्यासाठी ग्रामस्वराज्य निर्माण करणे आवश्यक आहे. ग्राम स्वराज्याबाबत गांधीजींची कल्पना अशी आहे की, ते एक पूर्ण लोकतंत्र असेल. त्यात कोणतेही गाव आपल्या प्राथमिक गरजांबाबत जिवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत शेजाऱ्यांवर अवलंबून राहणार नाही. म्हणजेच स्वावलंबी असेल. तरीही इतर गरजांसाठी जेंव्हा शेजारी खेडयाचे सहकार्य आवश्यक असेल, तेंव्हा ते करील. मात्र प्रत्येक खेडयाने स्वतःच्या गरजेपुरते धन्य, अन्य वस्तु व वस्त्रासाठी लागणारा कापूस पिकवील. गुरांना चरण्यासाठी लागणारी जागा आणि गावकऱ्यांना व त्यांच्या मुलांना खेळ (क्रिडांगण) आदिंकरीता लागणारी जागा राखून ठेवावी. या गरजा पुर्ण झाल्यावर, त्या खेडयाजवळ अधिक जमीन असेल, तर त्यांनी गांजा, तंबाखू, अफु अशी मादक द्रव्य सोडून शेतकरी विक्रीसाठी (पैसा उभारण्याकरीता) इतर पिकांचे उत्पादन घेतील. प्रत्येक खेडयात एक नाटयगृह, शाळा आणि सार्वजनिक सभागृह असेल. पिण्याच्या पाण्याची स्वातंत्र्य व्यवस्था असेल, जेणेकरून सर्वांना शुध्द, स्वच्छ पाणी मिळेल. विहीरी आणि तलाव यांचे योग्य नियंत्रण केल्यास ते सहज शक्य आहे. हया पाण्यावर सर्वांचाच सारखा अधिकार असेल.[३]

महात्मा गांधीजीच्या मते त्यांच्या कल्पनेतील गावाची लोकसंख्या जवळपास १००० असेल. अशा घटकाचे संघटन जर स्वावलंबनाच्या तत्वावर करण्यात आले. तर गांधीजींच्या मते त्यापासुन फार चांगले परिणाम मिळू शकतात. आपण आपल्या हाताचा उपयोग करणे तर विसरणार नाही. हा आज आपल्या सामोर धोका आहे. जमिन कशी खोदतात आणि मातीची काळजी कशी घेतात. हे जर आपण विसरलो तर असे समजा की, आपण स्वतःला विसरलो. आज आपली खेडी तीन विकारांनी जखडली आहे. १) सामुहीक स्वच्छतेचा अभाव २) अपुरा आहार ३) शैथिल्य. खेडयातील लोकांना स्वतःलाच आपल्या कल्याणात रूची नाही त्यांना स्वच्छतेच्या आधुनिक पध्दतीचे महत्व वाटत नाही. आपल्या शेतीची लागवड आणि प्रदीर्घ काळापासुन ते करीत आलेल्याकष्टाचे काम या शिवाय इतर कोणतेही काम करण्याची त्यांची इच्छा होत नाही. या अडचणी वास्तव आणि गंभीर आहेत. परंतु आपल्या ध्येयावर, निष्टठेवर, श्रध्दा ठेवली तर त्यावर सहज मात करता येते.[४]

प्राथमिक शिक्षण (बुनियादी शिक्षण) सर्वांसाठी अनिवार्य असेल, शक्यतो गावातील सर्व काम, कार्य सहकार्याने केली जातील. आपल्या समाजात असणारी जातपात आणि अस्पृश्यता ग्रामस्वराज्यात असणार नाही. सत्याग्रह आणि असहकार या शस्त्रासोबत अहिंसा मार्गाने, ग्रामातील सत्ता चालेल. ग्रामातील सत्तेवर ग्रामातील लोकांचे नियंत्रण राहील. सत्याग्रह आणि असहयोग हया शस्त्रासोबत अहिंसावर आधारीत सत्ता ही

ग्रामातील समाजाची शक्ती असेल. ग्रामाच्या संरक्षणासाठी ग्रामसैनिक असतील, ते आळीपाळीने पहारा देऊन ग्रामाचे रक्षण करतील. त्यासाठी एक हजेरी रजिस्टर ही ठेवले जाईल. गावाचे शासन चालविण्यासाठी दरवर्षी पाच पंचाची निवड करण्यात येईल. गावातील पात्र स्त्री पुरूष त्यांची निवड करतील. आजच्या सारखी न्याय व्यवस्था त्यात असणार नाही. परंतु या पंचायतीजवळ सर्व प्रकारचे अधिकार असतील. ग्रामपंचायतच कायदे संमत करने त्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य करेल. या ग्रामस्वराज्यात व्यक्तीगत स्वातंत्र्य असलेली लोकशाही असेल. व्यक्तीच सरकारचा निर्माता असेल. व्यक्ती व सरकार दोघेही अहिंसा तत्वानुसार कार्य करतील. आज सुध्दा एखादया खेडयाची इच्छा असल्यास ते खेडे स्वतःपुरती अशी व्यवस्था निर्माण करू शकते. व्यक्ती आपल्या गावाच्या सहकार्याने सर्व जगासी लढू शकेल. कारण प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील मुलभूत तत्व म्हणजे त्याने आपल्या गावाच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणे हे होय. खेरे प्रजातंत्र आणि ग्रामीण जिवन याबाबत प्रेम असणारा कोणीही एका गावी जाऊन राहु शकतो. गावालाच सर्वस्व मानून कोणतेही काम करू शकतो, त्याचा परिणाम चांगलाच होईल.[५]

महात्मा गांधी असे म्हणतात की, गावातील लोकांनी अशा वस्तूंची निर्मीती करावी की, त्या सर्वांच्या गरजेच्या असाव्यात व त्याच ठिकाणी त्यांना मिळू शकतील. घराच्या आजुबाजूला भाजीपाला लावता येईल व पशुंनाही ठेवता येईल इतकी जागा असेल. गावातील रस्त्यावर आणि गल्लीत धुळ असणार नाही, आवश्यकतेनुसार गावात विहीरी असाव्यात ज्यावर गावातील सर्व लोक पाणी भरू शकतील, गावात सर्वांसाठी प्राथना मंदीर आणि घरे असावीत सार्वजनिक सभेसाठी एक वेगळे ठिकाण असावे. गावातील गुरे चरण्यासाठी एक राखीव भूमी असावी दुग्धयोजना असेल.गावात प्राथमिक आणि माध्यमिक शाळा असतील आणि त्यात औद्योगीक शिक्षण दिले जाईल. गावात एक ग्रामपंचायत असावी ती भांडणे मिटविण्याचे काम करील. आपल्याला लागणारे धान्य, भाजीपाला, फळे, आणि खादी ते ग्राम स्वतः निर्माण करेल. गावात फक्त ग्रामपंचायतीच्याच आदेशाचे पालन केले जाईल. ग्रामपंचायतीच्याच कायदयानुसार कार्य होईल. खरी शासक ही जनताच राहील. शेतकरी मानदंड असेल त्यामुळे पंचायत राज्यात सर्वात जास्त महत्व शेतकऱ्यांना असेल. गावातील भांडणे गावातच मिटविण्याचे कार्य केले जावे, मुळात भांडण होऊ नये याचीच दक्षता घ्यावी. अशी ग्राम स्वराज्याबाबत कल्पना महात्मा गांधीजीची होती.[६]

खेडयाची आज होणारी लुटमार थांबली तरच, खेडयांना संजीवन मिळेल. मोठया प्रमाणात मालाची निर्मीती करण्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून व्यापारी स्पर्धा आणि खेडयाची लुटमार होते. म्हणूनच खेडयांना स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनविण्यावर जोर दयावा. जी आधुनिक यंत्रे अवजारे गावकरी स्वतः बनवू शकतील वा खरेदी करू शकतील, अशा यंत्रांचा त्यांनी वापर करावा. अट एवढीच की, अशा यंत्रांचा त्यांनी इतरांस नागविण्याकरीता उपयोग करू नये. ग्रामोद्योगाबाबत गांधीजी म्हणतात, आपण आपल्याला दैनंदिन लागणाऱ्या वस्तू खेडयातूनच मिळणाऱ्या साहित्याद्वारे निर्माण कराव्यात, जे गावातून मिळत नसेल ते थोडे परिश्रम आणि संघटन करून किफायतीने उत्पन्न करता येईल की नाही, याची तपासणी करावी आणि किफायतीचाही विचार व्यक्तिगत नसावा, तर तो पूर्ण गावाच्या कल्याणाचा आसावा. सुरवातीला आम्हाला थोडी जास्त किंमत देऊनही कनिष्ट प्रतीच्या वस्तू मिळतील. परंतु त्यात रस घेऊन वस्तु निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास लवकरच श्रेष्ठ प्रतीच्या वस्तू बणविता येईल. त्यासाठी ग्रामातील जनतेने मदत करणे मात्र गरजेचे आहे. असे झाल्यास गावातील उत्पादनाचा विकास निश्चित होईल. ग्रामोद्योगांचा लोप, ऱ्हास झाल्यास खेडयांचा सर्वनाश अटळ आहे.[७]

महात्मा गांधी यंत्राच्या विरोधी नव्हते. परंतू भारतात मनुष्यबळ अधिक असल्याने,यंत्राची फारशी आवश्यकता नाही. माणसे कामे करण्यास कमी पडत असेल तरच यंत्राचा वापर करणे शहाणपणाचे होईल. मोठया प्रमाणात यंत्राचा वापर केल्यास बेकारीची संख्याही मोठया प्रमाणात वाढेल. गांधीजी म्हणतात लोकांना शरीर श्रमापासून मुक्त कसे करावे ही आमचीमुळीच समस्या नाही. उलट ज्यांना वर्षातील काही महीने आळसात (म्हणुनच दारिद्रयांत) काढावे लागतात, त्यांना त्यांच्या फावल्यावेळी कोणते उत्पादनक्षम काम द्यावे ही आमची खरी समस्या आहे. लोकांना माझे म्हणणे पटणार नाही, पण वस्तुतः प्रत्येक कापड गिरणी ही गावकऱ्यावर एक महासंकट आहे. ती गिरणी अनेकांना बेकार करून त्यांच्या तोंडचे घास काढून घेत आहे. पुढे गांधीजी म्हणतात माझा अंदाज असा आहे की, प्रत्येक मिलमजूर गावातील १० मजुरांची रोजी हिरावत असतो. त्याचे स्वतःचे उत्पन्न खुशाल वाढलेले असेल. परंतु अशा प्रकारे कापड गिरण्यांनी खेडोपाडयातील असंख्य लोंकांचे उपजिविकेचे एक मोठे साधन हिरावून घेतले आहे. गिरण्यांचे कापड चांगले आणि स्वस्त असेल हे म्हणने निरर्थक आहे. कारण हजारो मजूर जर बेकार झाले असतील, तर परिणामी हे स्वस्त गिरणी कापड खेडयातील महागातल्या महाग खादीपेक्षा महाग पडेल. कोळशाच्या, खाणीत काम करणाऱ्या मजुराला त्याच ठिकाणचा कोळसा महाग पडणार नाही. त्याचप्रमाणे ग्रामीण लोकही आपापली खादी बसल्या ठिकाणी, जर निर्माण करतील तर ती त्यांना महाग पडणार नाही. यंत्राला विरोध करण्याचे कारण म्हणजे, यंत्रांनीचपाश्चात्य राष्ट्रांना दुसऱ्याचे शोषण करण्याचे सामर्थ्य दिले आहे. आमच्या यंत्रप्रेमाचे मुळे जनसेवेच्याभावनेत नसून आमच्या द्रव्यलोभात आहे. ज्या यंत्रामुळे शारिरीक परिश्रमाचे उच्चाटन होऊन हजारो लोकांवर उपाशी मरण्याची आणि अर्धनग्न राहण्याची पाळी येते, अशा यंत्र वेडेपणाला माझा विरोध आहे. यंत्राच्या या दुरूपयोगाविरूध्द मी आपली शक्ती, सर्वस्वपणाला लावून लढत आहे. परंतु ज्या यंत्राने वैयक्तिक परिश्रम वाचतील आणि परिणामी झोपडयात राहणाऱ्या लाखो करोडो लोकांवरील श्रमभार हलका होईल अशा यंत्राचे मी स्वागत करील.[८]

लोकांना सुखी करून त्यांची नैतीक व आध्यात्मिक उन्नती करणे हे ध्येय विकेंद्रीकरणाद्वारेच साध्य होऊ शकते. भारतातला आपला विकास अहिंसेच्या मार्गाने करावयाचा असेल, तर अनेक गोष्टीचे विकेंद्रीकरण करावे लागेल. केंद्रीकरण करण्याची आणि त्यांच्या रक्षणासाठीहिंसा अनिवार्य आहे. परंतु ज्या झोपडीतून लुटून नेण्यासारखे काहीच नसते, त्यांचे रक्षण करण्यासाठी पोलीस लागत नाहीत. मात्र श्रीमंताचे रक्षण करण्ण्यासाठी बलवान पहारेकरी लगतात, हेच मोठया कारखान्यांनाही लागू आहे. रक्षणदृष्टया शहरे कितीही सज्य केली तरी खेडयांना केंद्रबिंदू मानून निर्माण केलेल्या भारतापेक्षा, शहरीभारत निःसंशय अधिक धोकादायक असेल. जगाने पोलादी शस्त्र धारण करून, ते देश ऐषोआरामात लोळत आहे. अशा जगात भारतासारख्या देशाला साधे जीवन जगता येईल काय, असा कोणालाही प्रश्न पडेल, उत्तर सोपे आहे, साधे जीवन जर चांगले असेल तर त्यासाठी प्रयत्न केलाच पाहीजे. मग तसा प्रयत्न एखाद्या व्यक्तीचा असो, की राष्ट्राचा असो. काही मोठया उद्योगांची गरज देशाच्या विकासासाठी आवश्यक असते, हे गांधीजींना माहीत आहे, पण त्यावर सरकारची मालकी असावी असे गांधीजी म्हणतात.[९]

महात्मा गांधी म्हणतात. अशा प्रकारचे ग्राम स्वराज्य निर्माण करण्यास एका व्यक्तीचे पूर्ण आयुष्य संपू शकते. खरे प्रजातंत्र आणि ग्रामीण जीवनाचा खरा प्रेमी एका गावी राहून त्यालाच पुर्ण विश्व मानून काम करू शकतो. निश्चितच त्याला योग्य फळ मिळाल्याशिवाय राहणार नाही. ग्रामातील कला व कारागीरांचा अशा प्रकारे विकास व्हायला पाहीजे की, त्यांनी बनविलेल्या वस्तूंची प्रचंड मागणी असेल व त्याची किंमत केली जाईल. ज्यावेळी गावाचा पूर्ण विकास होईल. त्यावेळी कला, कारागीर स्त्री–पुरूषांची ग्रामात कमी नसेल. ग्रामात कवी, चित्रकार, शिल्पी, भाषा पंडीत, संशोधन करणारे इ. व्यक्ती असेल, थोडक्यात अशी कोणती वस्तू नसेल जी गावात मिळणार नाही. आज आमचे ग्राम उजाड, कुडे–कचऱ्याचे ढिग बनले आहे. पुढे हेच आमचे ग्राम, ग्रामस्वराज्याच्या कल्पनेमुळे सुंदर बनून, कचऱ्याच्या जागेवर सुंदर बगीचे असेल, ग्रामवासियांना लुटने, त्यांचे शोषण करणे पुढे अशक्य होईल, असे गांधीजीचे म्हणने होते. अशाप्रकारे ग्रामस्वराज्याची कल्पना आपल्या ग्रामस्वराज्याविषयक विचारातून महात्मा गांधीजींनी व्यक्त केली आहे.[९]

### निष्कर्ष :

महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्याचे विचार सत्य, अहिंसा, स्वावलंबन, विकेंद्रीकरण, आर्थिक पुनर्रचना इ. तत्वावर आधारीत आहे. मुलांना शिक्षण देत असतांनाच, शिक्षणाबरोबर औद्योगीक शिक्षणसुध्दा दिले जावे, असे गांधीजी म्हणत. ग्रामात गृहउद्योग, कुटीरउद्योग निर्माण करून

ग्रामाला लागणाऱ्या वस्तू ग्रामातच तयार कशा होईल, यावर भर दिला पाहिजे. म्हणजे ग्राम स्वयंपूर्ण असले पाहिजे. सर्वांना स्वच्छ पाणी व शुध्द हवा मिळाली पाहिजे, यावर ग्रामाणे लक्ष केंद्रीत करावे. ग्रामात स्वच्छता व आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. कला, कारागीरांचा विकास झाल्यास, उत्तम प्रकारच्या वस्तू ग्रामातच मिळेल. महात्मा गांधी यंत्राच्या विरोधी नव्हते, परंतू भारतात प्रचंड मनुष्यबळ असल्याने, त्यांना काम कसे द्यावे, हा प्रश्न असतांनाच यंत्राचे काय काम असे गांधीजी म्हणत. मात्र. मोठे यंत्र देशाच्या विकासासाठी आवश्यक असून, त्यांची मालकी सरकारकडे असावी. ग्रामाचा विकास झाल्याशिवाय, भारताचा विकास शक्य नाही. असे गांधीजीच्या ग्रामस्वराज्य विषयक विचारातून दिसून येते.

***संदर्भ ग्रंथ :***


१)महात्मा गांधी : माझ्या स्वप्नांचा भारत, परमधाम प्रकाशन, पवनार वर्धा , २०१० पृ.क्र १९

२)अनु. ब्रिजमोहन हेडा : महात्मा गांधीचे विचार, नवजिवन प्रकाशन मंदीर अहमदाबाद, २०१० पृ.क्र ३६३,६४

३)महात्मा गांधी : मेरे सपनों का भारत,राजपाल एन्ड स.ज. काश्मिरी गेट दिल्ली २०१० पृ.क्र ८४, ८५

४)अनु. ब्रिजमोहन हेडा : महात्मा गांधीचे विचार, नवजिवन प्रकाशन मंदीर अहमदाबाद, २०१० पृ.क्र ३६८

५)महात्मा गांधी : माझ्या स्वप्नांचा भारत, परमधाम प्रकाशन, पवनार वर्धा , २०१० पृ.क्र १९

६)महात्मा गांधी : मेरे सपनों का भारत, राजपाल एन्ड स.ज. काश्मिरी गेट दिल्ली २०१० पृ.क्र. ८५, ८६, ८७

७)महात्मा गांधी : माझ्या स्वप्नांचा भारत, परमधाम प्रकाशन, पवनार वर्धा , २०१० पृ.क्र २१

८)कित्ता : पृ.क्र. २२, २३

९)कित्ता : पृ.क्र. २६

१०)महात्मा गांधी : मेरे सपनों का भारत, राजपाल एन्ड स.ज. काश्मिरी गेट दिल्ली २०१० पृ.क्र ८४, ८५, ८६

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org